# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१

**तात्काळ / ईमेलद्वारे**

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.७०(२०-२१)/११८८
नागपूर ४४०००१, दिनांक २५/११/२०२२

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) सर्व
वनसंरक्षक (प्रा.) सर्व

**विषय :** भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरणेबाबत

**संदर्भ:**
१) शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४/५/२०२२
२) शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.१३६/का.१३-अ, दिनांक २१/११/२०२२
३) शासन, महसूल व वनविभाग पत्र क्र. एफएसटी-०६/२२/प्र.क्र.१२९/फ-४, दिनांक २२/११/२०२२

भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत एकत्रित मार्गदर्शक सूचना सामान्य प्रशासन विभागाने दि. ४/५/२०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आहेत. आता सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय दिनांक २१/११/२०२२ अन्वये भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याताना यापुढे स्पर्धा परिक्षा टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेक) व आय.बी.पी.एस. (इंस्टिट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपनीमार्फत ऑनलाईन पध्दतीने घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार ऑनलाईन पध्दतीने स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी यापैकी कोणत्याही एका कंपनीची आवश्यकतेनुसार निवड करावयाची आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये परीक्षा शुल्क, कंपनीशी करावयाचा सामंजस्य करार याबाबतच्या सुधारीत तरतुदी दिलेल्या आहेत.

२. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१/११/२०२२ च्या शासन निर्णयातील कार्यपध्दती / तरतुदी यांची तपासणी करुन भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करणेबाबत शासनाने संदर्भ ३ वरील पत्रान्वये सुचीत केले आहे.

३. उपरोक्त सुचनांचे अनुषंगाने कळविण्यात येते की, वनविभागातील सरळसेवेने भरती करावयाच्या पदांची यादी यासोबत जोडली आहे. सदर पदांपैकी ज्या संवर्गाची बिंदूनामावली मुख्य वनसंरक्षक (प्रा.) / वनसंरक्षक (प्रा.) किंवा त्यांचे अधिनस्त वनविभाग स्तरावर आहे त्या संवर्गाची भरती प्रक्रिया सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ४/५/२०२२ व दिनांक २१/११/२०२२ मधील सुचनांचे अनुषंगाने राबविणेकरीता खालीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम आखून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | सर्व संवर्गाची बिंदूनामावली मंजूर करुन घेणे | ०२/१२/२०२२ पर्यंत |
| २ | सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१/११/२०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार ऑनलाईन भरतीप्रक्रियेसाठी टि.सी.एस.-आयओएन (टाटा | ५/१२/२०२२ पर्यंत |

| अ.क्र. | टप्पा | कालमर्यादा |
|---|---|---|
| | कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेक) किंवा आय.बी.पी.एस. (इंस्टिट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपनीशी करार करणे | |
| ३ | जाहिरात प्रसिध्द करणे | २०/१२/२०२२ पर्यंत |
| ४ | अर्ज स्विकारणे | ३१/१२/२०२२ पर्यंत |
| ५ | ऑनलाईन परीक्षा घेणे | १०/१/२०२३ ते २०/१/२०२३ |
| ६ | ऑनलाईन परीक्षेचा निकाल जाहिर करणे | ३०/१/२०२३ पर्यंत |
| ७ | शारीरिक चाचणी / व्यावसायिक चाचणी (ज्या पदासाठी आवश्यकता आहे त्यासाठी) घेणे | १०/२/२०२३ ते २०/२/२०२३ |
| ८ | अंतिम निवडसूची जाहिर करणे | २८/२/२०२३ पर्यंत |
| ९ | नियुक्ती आदेश निर्गमित करणे | ०५/०३/२०२३ पर्यंत |

४. गट-क मधील लिपीक-नि-टंकलेखक संवर्गाची भरती प्रक्रिया ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येणार असल्याने सदर पदाची भरती प्रक्रिया आपले स्तरावर राबविण्यात येवू नये. याबाबत यापूर्वी कळविल्याप्रमाणे मागणीपत्र तात्काळ या कार्यालयास सादर करावे.

५. पूर्वी पेसा क्षेत्रात वनरक्षकांची १००% पदे ही स्थानिक अनुसूचित जमातीकरीता राखीव होती. मा. राज्यपाल यांचेकडील अधिसूचना दि. २९/८/२०१९ अन्वये पेसा क्षेत्रातील पदे अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येनुसार १००%, ५०% व २५% याप्रमाणे राखीव करण्यात आली आहे. सदर अधिसूचना वनविभागात कशाप्रकारे अंमलात आणावी याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. त्यामुळे पेसा क्षेत्रातील वनरक्षक पदांबाबत वेगळ्याने सुचना निर्गमित करण्यात येतील. वनरक्षक भरती प्रक्रिया ही महसूल व वनविभाग शासन निर्णय दिनांक २८/८/२०१८ अन्वये ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार राबवावयाची आहे. त्यानुसार बिगर पेसा क्षेत्रातील वनरक्षक भरतीकरीता वरीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम राबवून प्रक्रिया पूर्ण करावी.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे

(एम.श्रीनिवासा राव)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)**:- प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता सादर. मा. राज्यपाल यांचेकडील अधिसूचना दि. २९/८/२०१९ अन्वये पेसा क्षेत्रातील पदे अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येनुसार १००%, ५०% व २५% याप्रमाणे राखीव करण्यात आली आहे. सदर अधिसूचना वनविभागात कशाप्रकारे अंमलात आणावी याबाबत या कार्यालयाचे पत्र दिनांक २०/४/२०२२ व ३१/१०/२०२२ अन्वये शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. कृपया यावर शासन स्तरावरुन मार्गदर्शन मिळणेस विनंती आहे.

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)**:- प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१३ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. त्यांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)**:- कक्ष अधिकारी, कक्ष-७ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. त्यांनी सोबत जोडलेल्या यादीतील ज्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम नाहीत, अशा संवर्गाचे सेवाप्रवेश नियमाचा मसूदा तात्काळ शासनास सादर करावा. तसेच त्यांचेशी संबंधित संवर्गाचे बाबतीत वरील कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे कार्यवाही करावी.

३५१

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२८१३६२३

क्रमांक : एफएसटी-०६/२२/प्रक्र.१२९/फ-४ दिनांक :- २२ नोव्हेंबर, २०२२

प्रति,
**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**विषय :-** भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत.

**संदर्भ:-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/प्रक्र.५४/का.१३-अ, दि.०४.०५.२०२२.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/प्रक्र.१३६/का.१३-अ, दि.२१.११.२०२२

महोदय,

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबतच्या एकत्रित मार्गदर्शक सूचना सामान्य प्रशासन विभागाने दि.०४.०५.२०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आहेत.

२. आता, सामान्य प्रशासन विभागाने संदर्भाधीन क्र.२ येथील नमूद शासन निर्णय दि.२१.११.२०२२ अन्वये भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना यापुढे स्पर्धा परिक्षा टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टिट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपनींमार्फत ऑनलाईन पध्दतीने घेण्यास शासन मान्यता दिली आहे. त्यानुसार ऑनलाईन पध्दतीने स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी यापैकी कोणत्याही एका कंपनीची आवश्यकतेनुसार निवड करावयाची आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये परीक्षा शुल्क, कंपनीशी करावयाचा सामंजस्य करार याबाबतच्या सुधारीत तरतुदी दिलेल्या आहेत.

URGENT

१०(२)(१)

३. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.११.२०२२ च्या शासन निर्णयातील कार्यपध्दती/ तरतुदी यांची तपासणी करुन भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला

(सुनिल पांढरे)
उप सचिव, महसूल व वन विभाग

प्रत :-

१.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. निवडनस्ती